
ओळख
प्राणी-पक्ष्यांची
अविनाश जमदग्नी
परी प्रकाशन



**ओळख प्राणी-पक्ष्यांची**

© सुरक्षित

**प्रकाशक :**
**परी प्रकाशन**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.


**प्रमुख वितरक**
**अजब डिस्ट्रिब्युटर्स**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

**मुखपृष्ठ :**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक :**
जयंत प्रिंटरी

**आवृत्ती :**
२९ ऑगस्ट, २०१३

**किंमत :**
रुपये १००/-




ओळख प्राण्यांची

# ओळख प्राण्यांची

## अनुक्रमणिका


१. ओरँग-ऊटँग /५
२. गोरिला /६
३. चिपाँझी /७
४. हत्ती /७
५. सिंह /९
६. वाघ /१०
७. लांडगा /११
८. तरस /१२
९. कोल्हा /१३
१०. खोकड /१४
११. जिराफ /१४
१२. माकड /१५
१३. वानर /१६
१४. गेंडा /१७
१५. पाणघोडा /१८
१६. गवा /१९
१७. नीलगाय /२०
१८. गायाल / मिथुन /२१
१९. ताकिन /२२
२०. लामा /२३
२१. ग्वानाको/व्हिकुना/२३
२२. तेवांग /२४
२३. स्लो लॉरीस /२५
२४. वीझल/२६
२५. अर्मीन /२७
२६. सेबल /२७
२७. स्कंक /२७
२८. बिव्हर /२८
२९. पाणमांजर /२९
३०. बँजर /२९
३१. लिंक्स /३०
३२. कुंपण डुक्कर /३१
३३. सील (जलसिंह) /३२
३४. वॉलरस /३२
३५. पांढरे अस्वल /३३
३६. देवमासा /३४
३७. रेनडिअर /३५
३८. कस्तुरी बैल /३६
३९. याक /३६
४०. हिम बिबळा /३७
४१. पाणगाय.. /३८
४२. काळे अस्वल /३९
४३. लाल पांडा /४०
४४. ग्नू /४१
४५. चिचुंद्री /४१
४६. ट्री श्रू /४२
४७. मुंगूस /४३
४८. उद मांजर /४४
४९. जावडी मांजर /४५
५०. जंगली कुत्रा /४६
५१. उंट /४७
५२. साळींदर /४७
५३. खुळखुळ्या साप /४८
५४. जंगली मांजर /४८
५५. वाघाटी /४९
५६. बिबळ्या वाघ /५०
५७. शेतातील उंदीर /५१
५८. झाडावरील उंदीर /५१
५९. घरगुती घुशी /५२
६०. शेतातील घुशी /५२
६१. ससा /५३
६२. काळवीट /५५
६३. चिंकारा /५६
६४. चौशिंगा /५६
६५. सांबर /५७
६६. ठिपकेवाले हरीण /५८
६७. भेकर /५९
६८. पिसोरी /६०
६९. रानडुक्कर /६१
७०. उडणाऱ्या खारी /६२
७१. शेक्रा... /६३
७२. पट्टेवाली खार /६४

✦ **ओळख पक्ष्यांची / ६५**

## ओरँग–ऊटँग (Orang Utan) :



मानवी जात निर्माण होण्यात या प्राण्याचा सहभाग मोठा आहे. यापासूनच मनुष्यप्राण्याची निर्मिती झाली असे म्हटल्यास वावगे होणार नाही. हा वानर कुळातील आहे. हा मानवाप्रमाणे चालू शकतो. त्याचे पुढचे पाय अगदी हातासारखे आहेत आणि मागील पायांवर तो चालू शकतो. त्याचा पुढचा पाय हा मानवी हातासारखाच आहे. तळहात, त्याची बोटे, बाहू, तसेच चेहऱ्याची ठेवण मनुष्याप्रमाणे आहे. फार काय डोके, कान आणि बसण्याची ढब यात मानवप्राणी आणि त्याच्यात विलक्षण साम्य आहे. फरक आहे केवळ त्याच्या रंगात. अंगावरील केस आणि फार काय त्याला शेपूटही नाही. म्हणूनच गमतीने म्हटले जाते नराची निर्मिती म्हणजे, मनुष्यप्राण्याची निर्मिती होताना 'वानर' मधील 'वा' चा लोप झाला. अशा रीतीने तो एक मानव व वानर यातला एक सांधाच म्हणावा लागेल. हा प्राणी शाकाहारी आहे. नुसती कंदमुळे आणि जंगलातील फळे खाऊन आपली उपजीविका करतात. याची ताकदही प्रचंड असते. त्यामुळे चार–पाच लोकांना तो लीलया लोळवू शकतो. याचे वजनही १५० ते २५० किलो इतके असते.

हा प्राणी मानवाप्रमाणे कुटुंबवत्सल आहे. एका टोळीत १५ ते २० किंबहुना २५ पर्यंत यांची संख्या असते. वयोवृद्ध आजोबाला ते मानतात. त्याच्या सूचना लक्षात घेऊन कर्ते वानर पुढे असतात. मध्ये छोटी छोटी पिले आणि त्यांच्या आया असतात आणि बाजूला इतर मोठे, तसेच ज्येष्ठ वानर असे राहतात. यांचे वास्तव्य मोठ्या झाडावर असते. एका झटक्यात या फांदीवरून त्या फांदीवर सहज जातात. मादी वर्षातून एका पिलास जन्म देते. मात्र सर्व कुटुंब या पिलाची काळजी घेते. या प्राण्यांचे वास्तव्य विषववृत्तावरील घनदाट अरण्यात म्हणजे, अमेरिकेत ॲमेझॉनचे खोरे, आफ्रिका खंडातील काँगो नदी, जावा, सुमात्रा, बोर्निओ, वेस्ट इंडिज बेटे येथे आढळून येते. नदीच्या काठीही मोठ्या झुडपात यांची वस्ती दिसून येते. यांची वयोमर्यादा ८० ते १०० वर्षे इतकी आढळून आली आहे. त्यामुळेच मानवप्राण्यातील साम्यतेचा हा दुवा महत्त्वाचा मानला जातो. मानवाप्रमाणे हावभाव असल्याने सर्कशीतही यांकडून अनेक करमणुकीचे कार्यक्रम करवून घेतले जातात.

✦


## गोरिला (Gorila) :



हा वानर कुळातील असून, ओरँग-ऊटँगप्रमाणेच त्याचा जीवनक्रम आहे. याच्यात आणि मानवी हालचालीत साम्य आहे. तसेच हा लवकर माणसाळतोही. हा रंगाने बराच काळा आहे. याचे पायदेखील मानवाप्रमाणेच आहेत. डोळे मिचमिचे, चेहऱ्यावर थोड्या सुरकुत्या. मात्र कान मोठे असतात. नाक व ओठही चांगले जाड असतात. तो ताकदीनेही चांगला भक्कम असतो. हाही शाकाहारीच आहे. बाकीचा जीवनक्रम, आयुर्मर्यादा ओरँग-ऊटँगप्रमाणे आहे.

✦

## चिपाँझी (Chimpanzee) :



हा देखील वानर कुळातील आहे. याच्यात आणि माणसात विलक्षण साम्य आहे. वर्णाने काळा मिट्ट, पोटाचा भला मोठा नगारा, दोन-अडीच इंचाचे कपाळ, डोके अगदी कानटोपी घातल्यासारखे. याची पावले म्हणजे अंगठा आणि चार बोटे सुटी. त्याच्या डोक्यावरील केशरचनेने तो आपण जसे रात्री कानटोपी घालतो, त्याप्रमाणेच वाटतो. याचा आहार शाकाहारी तर आहेच; पण काही वेळा तो छोट्या प्राण्यांनाही मारून खातो. त्यामुळे त्याला काही वेळा रानटी मानव असे म्हटले जाते. या वानराची वस्तीही झाडावरच असते आणि हा देखील टोळीने राहतो. एकूण या तिघांमध्ये आणि मानवी प्रकृतीत खूपच साम्य असल्याने मानवी प्राण्यावर औषधोपचार करण्यापूर्वी अनेक औषधे, लसी यांचा शास्त्रज्ञ मंडळी यांच्यावर प्रयोग करून त्यानंतर अनेक लसी व औषधे मानवी कल्याणासाठी बाजारात आणली जातात. त्यामुळे मानवाच्या सुसह्य जीवनात या सर्वांचा मोलाचा वाटा आहे असे म्हणावेसे वाटते.

✦

## हत्ती (Elephant) :

हत्ती हा प्राणी जमिनीवरून चालणाऱ्या सर्व प्राण्यांत बलवान, धिप्पाड, उंच असा प्राणी आहे. भारतात आसाम, म्हैसूर येथील जंगलात, तसेच महाराष्ट्रातही याचे वास्तव्य दिसून येते. भारताशिवाय नेपाळ, श्रीलंका, आफ्रिका, म्यानमार, थायलंड येथे हत्ती आढळून येतात. तथापि आफ्रिकेतील हत्ती खूपच मोठे असतात. रानटी हत्ती ताकदीने एवढे प्रचंड असतात की इतर मोठे हिंस्र प्राणी त्यांच्यापुढे टिकत नाहीत; पण जेव्हा हत्ती माणसाळले जातात, तेव्हा त्यांच्याएवढा

ममताळू आणि विश्वासू प्राणी शोधून मिळणार नाही. विशेषत: त्यांना सांभाळणारे माहूत आणि त्यांचे कुटुंबीय यांचा तो जिवलग असतो. अगदी छोट्या तान्हुल्याला त्याच्यापुढे टाकून माहुताची बायको आपले कामकाज करण्यास नि:संकोचपणे बाहेर जाते. हत्तीच्या या गुणामुळे हिंस्र श्वापदेही त्याच्यापुढे येत नाहीत आणि तसा बाका प्रसंग



ओढवला असल्यास हत्ती आपल्या सोंडेने त्याला खेळवून मारतो. इतकी ताकद त्या सोंडेमध्ये आहे. मात्र याच सोंडेच्या साह्याने तो जवळपासचे डास, पंखांचे कीटक सहज पिटाळून लावतो. आकाराने मोठा असलेला हा प्राणी इवलेसे डोळे, सुपासारखे कान आणि खांबासारखे पाय, यामुळे प्रसिद्ध आहे. हत्ती माणसाळल्यामुळे सर्कशीत विविध कसरतीची कामे करणे यासाठी उपयोगात येऊ लागला. तसेच जंगलातही मोठमोठाली झाडे सोंडेने गदागदा हलवून मुळासकट उपटून टाकतो. तसेच झाडांचे ओंडकेही वाहून आणतो. जंगलात माल वाहतुकीसाठी हत्तीचा मोठा उपयोग होतो. एकदा तो माणसाळला की दुसरे रानटी हत्ती माणसाळण्यासाठी उत्तम उपयोग होतो.

हत्ती हा प्राणी जंगलात कळपाने राहतो. पुढे मोठे हत्ती, मध्ये हत्तीणी आणि पिले आणि बाजूलाही मोठे हत्ती असे वावरत असतात. त्यांनाही शिकारीचा वास चटकन येतो; पण सहसा जंगली श्वापद त्यांच्याकडे यायला धजावत नाही. हत्तीचे सुळे म्हणजे सोंडेलगतचे मोठे दात याचा उपयोग त्याला स्वसंरक्षण, तसेच ढुशा देण्यासाठी होतो. याला हस्तिदंत म्हणतात. हे फक्त नर हत्तीनाच असतात. याचा उपयोग अनेक प्रकारचे दागिने व शोभेच्या वस्तू करण्यासाठी होतो. यामुळे त्यांची मोठ्या प्रमाणात शिकार होते. तथापि वन्य प्राणी संरक्षण कायद्यामुळे त्यावर नियंत्रण बनले आहे. तरीदेखील चोरटी हस्तिदंताची तस्करी होत आहे. यामुळे मोठे चलन उपलब्ध होते. असा हा गजराज आपले आराध्य दैवत गणेशाचा मुखवटा असल्याने गणरायाला गजमुख असे म्हटले आहे. अफाट बुद्धीचा हा प्राणी मुंगीसुद्धा आपल्या नजरेने हेरू शकतो. जंगलात केळी, हिरवे गवत, फळे खाणे हा हत्तीचा आहार आहे. शाकाहारी असणारा हा मोठा बलवान प्राणी प्राणीजगतातील आदराचे स्थान

आहे. इंद्राचे वाहन म्हणून त्याला मोठा मान आहे. त्याला ऐरावत म्हणतात. पूर्वी लढाईमध्ये गजदळ प्रसिद्ध होते. याचा रामायण–महाभारत या पौराणिक ग्रंथात उल्लेख आढळतो. त्याशिवाय इतिहासातही अनेक लढायांत हत्तीचा सहभाग असल्याचे वर्णन आहे.

✦

## सिंह (Lion) :

सिंह हा प्राणी दिसण्यात भव्य आणि खूपच सुंदर, तसाच प्रचंड शक्तिवान म्हणून त्याला 'वनराज', अर्थात जंगलाचा राजा म्हणतात. हा मार्जार कुळातील प्राणी आहे. सिंह हा प्राणी आशिया आणि आफ्रिका खंडात सापडतो. भारतात गुजराथ राज्यातील गीरच्या जंगलात आढळतो. सिंहाला राहायला खुरटी, झाडेझुडपे, उघडा प्रदेश, तसेच सुका गवताळ प्रदेशही चालतो. वाघापेक्षा सिंह अधिक चपळ असतो. दोघांची आपले भक्ष्य पकडण्याची पद्धत सारखीच असते. तथापि सिंह अधिक वेळ त्या शिकारीचा पाठलाग करतो. दबा धरून तो पाणी पिण्यासाठी येणाऱ्या जंगलातील हरीण, नीलगाय, शेळ्या, सांबर, रानडुकरे, मेंढ्या, बैल अशासारख्या प्राण्यांना आपल्या गर्जनेनेच गारद करतो आणि ते भीतीने बावचळले की त्या गाफील क्षणी त्यांची शिकार करतो. त्याची शक्ती इतकी असते की रेडा, बैल यांचे डोके तोंडात धरून शरीर आपल्या अंगावर टाकून अगदी सहज धावतो. याची उडीदेखील वाघापेक्षा लांब, प्रभावी आणि अचूक असते; पण चुकून फसल्यास त्याची त्याला लाज वाटते. तो गप्प राहतो. संतापाच्या भरात स्वत:च आपल्या शेपटीने स्वत:वर आघात करून घेतो. शेपटीच्या झुबक्यात काट्यासारखे केस असतात. त्यामुळे ते वेदना देण्यास पुरेसे असावेत.

सिंह आयाळीमुळे खूप छान वाटतो. शिवाय त्याच्या या केसांमुळे त्याचा उग्र चेहराही सुंदर वाटतो. त्याची कमनीय कंबर पाहूनच एखाद्या रमणीच्या कमरेसही सिंहकटीची उपमा देतात. त्यामुळे सिंहाचे सौंदर्य त्याच्या चेहऱ्यापासून बांध्यापर्यंत, पीळदार पाय आणि झुबकेदार शेपटीतही सामावलेले असते. सिंहाच्या कळपात त्याच्याशिवाय मादी आणि दोन–तीन छावे. तर



एकाहून अधिक सिंहिणीही असतात. सिंहीण एका वेळी दोन–तीन छाव्यांना जन्म देते. वर्षभर ती पिले तिच्या समवेत असतात. ती पिलांना जिवापाड जपते आणि त्यांच्यासाठी धोका पत्करून प्रतिस्पर्ध्यांना गारद करते. पूर्वी सर्कशीत त्यांचे खेळ होत. आता सरकारने त्यावर बंदी घातली आहे. त्यांची संख्या कमी होत असल्याने शिकारीवरही बंदी घातली आहे.

✦

## वाघ (Tiger) :

भारतात वाघ उत्तर आशिया खंडातून आला. मांचुरीयन किंवा उसूरी वाघ हा बराच मोठा असून त्याची कातडी जाड व लांबलचक असते. भारतामध्ये सापडणारी आणखीन एक वाघाची उपजात आहे. त्याला 'रॉयल बेंगॉल टायगर' असे म्हणतात. बंगाल प्रांतात ते आढळून आले आहेत. पूर्वी वाघांची संख्या बरीच होती. आता ती त्या मानाने कमी आहे. जंगलातील हरणे, रानडुकरे असे नैसर्गिक भक्ष्य यांची संख्या कमी होण्याचे ते कारण असू शकेल.

जंगलाच्या दुनियेत वाघ हा सिंहाइतकाच बलवान आहे. तथापि याचा स्वभावच भयंकर क्रूर दिसतो. त्याच्या शरीरावरील पट्ट्यांमुळे उग्रता अधिकच भासते. वाघाचा माजावर येण्याचा हंगाम सोडल्यास तो एकटाच वावरतो. वाघ शिकार पकडण्यासाठी मैलोनमैल हिंडत असतो. तथापि एखाद्या दुसऱ्या वाघाच्या हद्दीत शिरताच दुसऱ्या वाघाबरोबर भांडणही होते. त्यातील दुर्बल वाघ अर्थातच माघार घेतो. वाघाची दृष्टी, श्रवणशक्तीबरोबर गंधज्ञान हे तीव्र असते. वाघ सहसा मनुष्यास मारत नाही.

तथापि अपघाताने मारला गेल्यास त्यास तो खात नाही. अशा माणसाचे मांस वाघाने खाल्ल्यास तो नरभक्षक बनतो. अशा वाघाची पिलेसुद्धा नरभक्षक बनू शकतात. साधरणत: नरभक्षक वाघांची संख्या अत्यंत अल्प असते. कारण जंगलात त्यांना हरीण, नीलगाय, रानडुक्कर असे प्राणी मिळतात. माणसाकडून दुखापत न झाल्यास वाघासारखा सुरक्षित असा दुसरा प्राणी नाही. मात्र त्यांना धोका दिल्यास विशेषत: आपल्या

